# N 614

Seat No. | | | | | | | |

2022 III 16 1030 -**N 614**- MARATHI (16) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)

(REVISED COURSE)

Time : 3 Hours (Pages 15) Max. Marks : 80

---

## कृतिपत्रिकेसाठी सूचना :—

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतींची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग 5—उपयोजित लेखन **प्र. 5 (अ) (2)** सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील **प्र. 1 (इ)** अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग 1 : गद्य

1. (अ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) चौकटी पूर्ण करा : 2

(*i*) उताऱ्यात आलेले नदीचे नाव — ☐

(*ii*) बाळाची आई करत असलेला उद्योग — ☐

P.T.O.

Previous Pathshala

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उद्योगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित'शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, "त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस." या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामत: त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, "या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे."

(2) आकृतिबंध पूर्ण करा : 2

[ ] ← कार्यक्रमात नारायण सुर्वे यांना सन्मानाने मिळणाऱ्या वस्तू → [ ]

(3) **स्वमत :** 3

'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

Previous Pathshala

(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) कोण ते लिहा : 2

(*i*) निरंजनचा सर्व खर्च करणारे – ☐

(*ii*) निरंजनला मावशीकडे सोडून पुन्हा न परतलेला – ☐

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानगा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरातल्या सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी निरंजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. संध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपून अभ्यासाला बसायचा. गुरुजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकावायचा. त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा. आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खूश होता.

(2) का ते लिहा : 2

(*i*) निरंजन वार लावून जेवायचा, कारण .....................

(*ii*) निरंजन झटून अभ्यास करायचा, कारण .....................

(3) तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा. 3

P.T.O.

Previous Pathshala


# 4/N 614

## अपठित गद्य

(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) आकृतिबंध पूर्ण करा : 2

संकटांकडे पाहण्याची दृष्टी अशी असावी



अडचणींनी आणि रोगांनी भांबावून जाण्याचे काय कारण आहे ? संकटे ही काही कायमची नसतात ना ? मग त्यांच्याकडे सोशिकपणे, खिलाडू वृत्तीने पाहण्याची दृष्टी का असू नये ? संकटांचे जेव्हा आपल्यावर आक्रमण होते, तेव्हा ती फार मोठी किंवा असह्य वाटतात; परंतु ती ओसरल्यावर, आपण त्यांना का घाबरलो तेच आपल्याला समजत नाही. आपण घाबरतो याचे कारण आपल्याजवळ मनाची स्थिरता किंवा शांती नसते. मनाची शांती नसते याचे कारण अडचणींचे खरेखुरे स्वरूप आपणांस कळलेले नसते. जीवन म्हणजे संकटे नव्हेत, कारण ती असतानाही जीवन चालूच असते. मळभ आल्याने सूर्य जसा नाहीसा होत नाही, त्याचप्रमाणे रोगांनी नि संकटांनी जीवनाचे मूळ आनंदी स्वरूप नाहीसे होत नाही. आजारी व संकटग्रस्त माणसेही जेव्हा थट्टा-विनोद करतात, तेव्हा ती या आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

Previous Pathshala

(2) कधी ते लिहा : 2

(*i*) आपण संकटांना का घाबरलो तेच आपल्याला समजत नाही.

(*ii*) आजारी, संकटग्रस्त माणसे आनंदमय जीवनाचा अनुभव घेत असतात.

## विभाग 2 : पद्य

**2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) योग्य पर्याय निवडा. 2

(1) सैनिकाचे औक्षण केले जाते.........

(*i*) भरलेल्या अंत:करणाने

(*ii*) डोळ्यांतील आसवांच्या ज्योतींनी

(*iii*) तबकातील निरांजनाने

(*iv*) भाकरीच्या तुकड्याने

(2) कवितेतील 'दीनदुबळे' म्हणजे.............

(*i*) कष्टाचे, पैशाचे सामर्थ्य नसलेले

(*ii*) सैनिकाबरोबर लढणारे

(*iii*) शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेले

(*iv*) सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय



Previous Pathshala

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी

Previous Pathshala

| |
|---|
| अशा असंख्य ज्योतींची<br>तुझ्यामागून राखण;<br>दीनदुबळ्यांचे असें<br>तुला एकच औक्षण |

(2) कृती करा : 2

(*i*) डोळे भरून पाहावे असे दृश्य – [ ]

(*ii*) अपुरे वाटणारे सामर्थ्य – [ ]

(3) प्रस्तुत कवितेतील खालील शब्दांचा अर्थ लिहा : 2

(*i*) औक्षण –

(*ii*) द्रव्य –

(*iii*) शौर्य –

(*iv*) आसवे –

(4) काव्यसौंदर्य : 2

'अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण'

या ओळीतील अर्थसौंदर्य स्पष्ट करा.



Previous Pathshala

(आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही *एका* कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :

| मुद्दे | 'योगी सर्वकाळ सुखदाता' *किंवा* 'हिरवंगार झाडासारखं' | | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – | | | 1 |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय – | | | 1 |
| (3) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा – | जन निववी श्रवणकीर्तनें।<br>निजज्ञानें उद्धरी॥ | झाड बसते<br>ध्यानस्थ ऋषिसारखं<br>मौन व्रत धारण करून<br>तपश्चर्या करत...... | 2 |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | | | 2 |
| (5) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा | (*i*) उदक–<br>(*ii*) मधुर–<br>(*iii*) तृषित–<br>(*iv*) क्षाळणे– | (*i*) मौन–<br>(*ii*) मुकाट–<br>(*iii*) वस्त्र–<br>(*iv*) बाहू– | 2 |

Previous Pathshala

## विभाग 3 : स्थूलवाचन

3. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : 6

(1) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते', हे विधान 'मोठे होत असलेल्या मुलांनो' या पाठाधारे स्पष्ट करा.

(2) तुम्हाला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

(3) टीप लिहा— व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

## विभाग 4 : भाषाभ्यास

4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

(1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा : 2

(i) अक्षय दररोज अभ्यास करतो.

(ii) अहाहा! किती सुंदर देखावा हा!

(2) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा : 2

(i) ही इमारत खूप उंच आहे. (उद्गारार्थी करा.)

(ii) आज पहाटे रानात उजेड नव्हता. (होकारार्थी करा.)

P.T.O.

Previous Pathshala

(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (कोणतेही **दोन**) : 4

(*i*) मूठभर मांस वाढणे.

(*ii*) उत्साहाला उधाण येणे.

(*iii*) मळमळ व्यक्त करणे.

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती :**

(1) **शब्दसंपत्ती :**

(1) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1

(*i*) मित्र

(*ii*) कनवाळू

(2) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1

(*i*) लहान

(*ii*) ज्ञान

(3) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा : 1

लिहिता वाचता येणारा – [ ]

Previous Pathshala

(4) वचन बदला : 1

(i) ठसा

(ii) शेंग

(2) **लेखननियमांनुसार लेखन :**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा :** 2

(i) पहिला दीवस सूरळीत गेला.

(ii) रात्रभरच्या वाटचालीने थकुन ती वीश्रांती घेत होती.

(3) **विरामचिन्हे :**

**खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा :** 2

(i) ''मावशी तुम्ही राहता कुठे''

(ii) ''शाबास छान खेळलास''



Previous Pathshala

## विभाग 5 : उपयोजित लेखन

5. (अ) खालील कृती सोडवा : 6

(1) **पत्रलेखन :**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही **एक** कृती सोडवा.

> संत गाडगेबाबा विद्यालय,
> संतभूमी चौक, अमरावती.
> शाळेच्या 'विद्यार्थी मंडळ'
> तर्फे आयोजित
> 'एकपात्री अभिनय स्पर्धा'
> दि. 3 जानेवारी स. 11 वा.
> sgbv.50@gmail.com.
> — मुख्याध्यापक

अशोक/आशा पवार, विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

| | | |
|---|---|---|
| स्पर्धेसाठी शाळेचे सभागृह उपलब्ध करून देण्याची विनंती करणारे पत्र शाळेच्या मुख्याध्यापकांना लिहा. | **किंवा** | प्रथम पारितोषिक प्राप्त स्पर्धक स्वाती/सुयश देसाई यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |

Previous Pathshala

किंवा

(2) **सारांशलेखन :**

विभाग 1 गद्य (इ) (प्र. क्र. 1-इ) मधील अपठित उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही *दोन* कृती सोडवा :** 10

(1) **जाहिरात लेखन :**

पुढील विषयावर जाहिरात तयार करा :

आयुर्वेदिक केशतेलाची आकर्षक जाहिरात तयार करा.

(2) **बातमीलेखन :**

खालील निवेदन वाचून बातमी तयार करा :

| |
|---|
| अभिनव विद्यालय, नागपूर |
| 'भव्य विज्ञान प्रदर्शन' संपन्न. |
| दि. 15 ऑक्टोबर ते 18 ऑक्टोबर |
| वेळ स. 11 ते सं. 5 वाजेपर्यंत |
| अध्यक्ष—श्री सुहास माने |
| प्रमुख पाहुणे—श्री. आशिष वाघ |
| * एकूण 50 शाळांचा सहभाग |
| * उद्‌घाटन सोहळा संपन्न |
| * उत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिके |
| * विज्ञान नाटिका सादर |

P.T.O.

Previous Pathshala

(3) **कथालेखन :**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :

एक गरीब मुलगा. – शाळेची फी भरण्यास पैसे नसणे – सकाळी पेपर टाकण्याचे काम – वाटेत पैशाचे पाकीट मिळणे – प्रामाणिकपणे पोलिस स्टेशनवर नेऊन देणे – पाकिटाच्या मालकास आनंद – बक्षीस.

(इ) **लेखनकौशल्य :** खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही **एक** कृती सोडवा. 8

(1) **प्रसंगलेखन :**


| |
|---|
| आदर्श विद्यालय, कोल्हापूर |
| 'मराठी भाषा दिन' सोहळा |
| दि. 27 फेब्रुवारी, स. 10 वाजता |
| * काव्यवाचन * कथाकथन |
| * नाट्यप्रयोग * गीतगायन |
| विविधरंगी कार्यक्रमांची मेजवानी. |

वरील सोहळ्यास तुम्ही उपस्थित होतात अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

Previous Pathshala

(2) **आत्मकथन :**

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा :




(3) **वैचारिक :**

'निसर्ग आपला गुरू' या विषयावर तुमचे विचार मांडा.